• कार्यक्रमा नंतरची वार्तापत्रे.

दै. लोकमत
८/६/०८

## विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानातील बदल अवगत करावे

– प्रा. विजय नवले

नाशिक दि. ८ (प्रतिनिधी) - अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी तंत्रज्ञानातील बदल अवगत करून घ्यावे. त्यासाठी वाचन वाढविणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रा. विजय नवले यांनी केले.

प. सा. नाट्यगृहात सेवाभावी समाजकल्याण संस्था, यशश्री अभियांत्रिकी क्लासेस आणि एम पॉवर (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभियांत्रिकी शिक्षणाचे राजमार्ग' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते. प्रा. नवले पुढे म्हणाले की, शैक्षणिक प्रगतीसाठी फक्त वेतनाचा विचार न करता तंत्रज्ञानाचाही विचार होणे गरजेचे आहे. अभियांत्रिकी शाखेत जाऊ इच्छिणाऱ्यांनी तांत्रिक कौशल्याचे निरीक्षण करावे. कोठेही काम करण्याची त्यांची तयारी असावी. फक्त संगणक किंवा माहिती आणि तंत्रज्ञान अभ्यासक्रमांचा विचार न करता अभियांत्रिकी क्षेत्रातील इतरही अभ्यासक्रमांचा विचार करावा.

**अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्याचे निरीक्षण आवश्यक**

प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. रवींद्र जोगळेकर यांनी केले. दीपक गोखले यांनी आभार मानले. यावेळी ॲड. मिलिंद चिंधडे, प्रा. महेश नारके आदि उपस्थित होते.

दै. गांवकरी दि. ८/६/२००८

## नाविन्याचा ध्यास घेतलेल्यांनीच अभियांत्रिकीकडे वळावे : प्रा. नवले

नाशिक (वार्ताहर):- कल्पनांच्या आधारे तंत्रज्ञानात बदल करून सतत नाविन्याचा ध्यास घेऊन कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांनीच अभियांत्रिकी शाखेची निवड करावी, असा सल्ला प्रा. विजय नवले यांनी अभियांत्रिकी शिक्षणाचे राजमार्ग या विषयावर व्याख्यान देताना सांगितले.

सेवाभावी समाजकल्याण संस्था, यशश्री क्लासेस व पुणे येथील एम. पॉवर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने परशुराम सायखेडकर सभागृहात आयोजित व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी प्रा. दीपक गोखले, ॲड. मिलिंद चिंधडे, प्रा. महेश नारके आदी उपस्थित होते.

प्रा. विजय नवले पुढे म्हणाले की, तंत्रज्ञानात बदल होऊ शकतात, मात्र असा विचार करणारे कमी आहेत. केवळ उत्तम पगार व प्रतिष्ठा मिळवून देणारे क्षेत्र असल्यामुळे अनेकजण या शाखेकडे वळतात. परंतु हा विचार दारिद्र्यपूर्ण असल्याचे ते म्हणाले. तसेच हुशार विद्यार्थ्यांनी फक्त आय.टी.किंवा कॉम्प्युटर या शाखेला महत्त्व न देता मॅकेनिकल, सिव्हिल आदींचाही विचार केला पाहिजे, असे सांगितले.

दहावीनंतर पॉलिटेक्निक तसेच बारावी नंतर इंजिनीअरिंग डिग्री प्रवेश प्रक्रियेसंदर्भात त्यांनी मार्गदर्शन केले. रवींद्र जोगळेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. दीपक गोखले यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आविष्कार २००८ कला भ्रमंतीतर्फे उत्साहात

नाशिक (वार्ताहर):- येथील कला भ्रमंती संस्था व बच्छाव क्लासेस संचलित विविध कला व व्यक्तिमत्त्व विकास केंद्राच्या वतीने नाशिक बाल कला आविष्कार-२००८ उत्साहात साजरा झाला.